**म.वि.स./क-१(आस्थापना)**

**दिनांक ३० जुलै, २०२१**

महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मर्यादित ५० % उपस्थिती लागू करण्यासंदर्भात महाराष्ट्र महसूल व वन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र.डीएमयु/२०२०/ सीआर.९२/डीआयएसएम-१, दिनांक २५ जून, २०२१ व सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्र.संकीर्ण १०२०/प्र.क्र.१९९/१९ अन्वये शासकीय कार्यालयातील उपस्थिती ५०% करणेबाबतचा आदेश निर्गमित केला होता.

उक्त आदेशानुसार या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती ही ५०% प्रमाणे मर्यादित केली होती.

या सचिवालयातील सर्व कक्षातील प्रलंबित कामे पूर्ण करण्याची आवश्यकता तसेच श्री.शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशन, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय अधिकारी व कर्मचारी कल्याण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विधिमंडळ सदस्यांसाठी "समर्पण ध्यानयोग" या एक दिवसीय शिबीराचे आयोजन मंगळवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजी सकाळी ११.०० ते १.३० या वेळेत मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे करण्यात येणार आहे. वाढते मानसिक ताणतणाव आणि कोविड १९ च्या संसर्गामध्ये उदभवलेली परिस्थिती यावर मात करण्यासाठी ध्यानसाधना पूरक ठरत असल्याने त्यादृष्टीने सर्वांना प्रेरक आणि पथदर्शी ठरेल असा हा उपक्रम राबविण्यात येत असून त्यास सर्व सन्माननीय विधानपरिषद / विधानसभा सदस्य उपस्थित राहणार आहेत. "समर्पण ध्यानयोग" या एक दिवसीय शिबीराच्या आयोजनाची घोषणा विधानपरिषद व विधानसभा सभागृहात दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी करण्यात आली होती. यासाठी या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती १००% प्रमाणे करणे आवश्यक आहे.

त्यानुसार या सचिवालयातील सर्व अधिकारी /कर्मचारी यांची दिनांक २ ऑगस्ट, २०२१ ते दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजीपर्यंत कार्यालयातील उपस्थिती १००% याप्रमाणे करण्यात येत आहे.

दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजीनंतर कार्यालयातील उपस्थिती ही महाराष्ट्र शासनाद्वारे निर्गमित करण्यात येणारा आदेश विचारात घेऊन राहील.

**मा.प्रधान सचिव यांच्या आदेशानुसार**